# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७० वा ❑ शुक्रवार दि.२२ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विनोद शेंडगे यांची सायकल वरून अनोखी पुस्तक वारी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**अंबाजोगाई (सौ. जयश्री अर्जुन मुंडे )**– वाचन चळवळीचा वारकरी
झेलीत पावसाच्या श्रावणसरी
ग्रंथालय हीच मानून पंढरी
गावोगावी रुजवी ज्ञान शिदोरी


अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र या चळवळीचे मुख्य प्रवर्तक आदरणीय विनोद शेंडगे सर यांची आज ''साहित्य निकेतन ग्रंथालय अंबाजोगाई !'' या ठिकाणी वाचन जन जागृती निमित्त सभा आणि बैठक पार पडली.

आज पहाटे सहा वाजता ते परभणी येथून सायकलवरून निघाले. त्यांचा वाचन दौरा हा परभणी पासून कोल्हापूर पर्यंत ठरलेला आहे.

त्यांचा प्रवास हा त्यांनी ठरवलेल्या वेळेनुसार सुरू झाला. त्यांनी अंबाजोगाई या पुस्तकांच्या गावासाठी सायंकाळी पाच ही वेळ दिलेली होती. त्या वेळेनुसार ते बरोबर पाच वाजता ''अनुराग पुस्तकालय'' येथे पोहचले. त्यांच्यासोबत विलास काळे सर , सोळंखे सर हे देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. तेथील भेटी नंतर ते साहित्य निकेतन या ठिकाणी आले. त्यांचे स्वागत ग्रंथालयाचे ग्रंथपाल आदरणीय कांतिलाल बेंडसुरे यांनी केले. आदरणीय विनोद शेंडगे सर यांच्याशी त्यांची भेट झाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह अवर्णनीय होता.

अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र विनोद शेंडगे यांचा दौरा यावेळी परभणी, अंबाजोगाई, लातूर, उमरगा, सोलापूर, सांगोला, सांगली, कोल्हापूर या मार्गे सुनिश्चित आहे.

त्यांनी परळी या ठिकाणी झालेल्या त्यांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि



त्यांच्यासोबत झालेल्या चर्चेची माहिती सांगितली.

'' नाचू पुस्तकांच्या अंगणी
गाऊ संस्काराची गाणी !''

अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र या अंतर्गत त्यांनी पाच कृती कार्यक्रम राबवण्याबद्दल माहिती सांगितली.

१.सहकुटुंब वाचन करू या. २. वाचनासाठी निमित्त शोधू या. ३.अक्षर आनंद पुस्तक वाचन स्पर्धा राबवू या. ४.अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र सुरू करू या. ५.मी वाचलेले पुस्तकं यावर बोलू या.

वाचनाचा लळा फुलवी जीवनाचा मळा

बाल मनाला लावू वाचनाचा लळा

वाचनासाठी सातत्याने प्रयत्न करणारे ऊन, वारा, पाऊस यांना न जुमानता त्यांना देखील आव्हानाप्रमाणे सकारात्मक स्वीकारणारे विनोद शेंडगे दादा विचारांना कृतीची जोड देणारे, वाचनाचे साजिकीकरण करणारे, अतिशय सकारात्मक समृद्ध विचारसरणी आणि उक्तीनुसार कृती ही या कलियुगातील दुर्मिळ गोष्ट पाहायला मिळाली.

निरपेक्ष कार्य आणि त्याचा आनंद हा चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. इतका दिवसभर प्रवास केलेला होता तरीही थकव्याचा, शिनल्याचा कुठे साधा लवलेशही नव्हता.

पावसात भिजत भिजत अशी वारी करण्याचा आनंद अमूल्य असतो हे उद्गार एक अतिशय निर्मळ मनच देते. त्यांचा कार्य करण्याच्या मागे असणारा निःस्वार्थ निरपेक्ष भाव मनाला आवडला.

असे व्यक्तिमत्व दुर्मिळ होत आहेत. सर्व जण आपापल्या सोयीच्या वलय निर्माण करून त्यात गुरफटलेले आहेत. आणि हा वारकरी वाचन जनजागृतीसाठी सायकल द्वारे प्रमुख वाचनालय , शालेय विद्यार्थी अशा ठिकाणी प्रेरणा स्तोत्र म्हणून सतत कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांच्या मनाला समृद्धता लाभावी यासाठी अनेक ठिकाणी सायकल दिंडी काढून जनजागृती करत आहेत.

'' पुस्तकं वाचू निपुण भारत घडवू या ! ''

हे त्यांचे ब्रीद आणि त्यानुसार त्यांची कृती, तळमळ, धडपड मनाला स्पर्शून गेली. कार्य जर आपण आवडीने स्वतःस झोकून देऊन केले तर आपल्याला अनेक मार्ग मिळतात आणि त्यातून आपला छंद जोपासला जातो. स्वतःची व्यक्तीने अचूकपणे ओळखली की व्यक्तीला निरपेक्ष आनंद मिळतोच.

अशा व्यक्तीचे वलय स्वतःभोवती निर्माण करणे म्हणजे स्वतःची कार्यप्रवणाता वाढविणे होय. अनेक सकारात्मक आणि सुरेख सद्गुणांची खाण या अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र चळवळीतून बालकांमध्ये रुजत आहे. बालकांना आत्म परीक्षण, आत्म निरीक्षण, यांची सवय लागत आहे. त्यांचा सर्वांगीण विकास अतिशय कुतूहल वाटणारा विकास या चळवळीतून घडत आहे. ही चळवळ सर्वांनी मिळून, सर्वांना सोबत घेऊन राबविणे ही काळाची गरज आहे.

अनेक सुंदर दृष्टिकोन विद्यार्थ्यांत निर्माण व वृद्धिंगत होत आहेत. अशा निःस्वार्थ निरपेक्ष कार्याला कोटी कोटी सलाम .

कार्यक्रम घ्यायचा तर अतिशय साधा घरगुती वाटावा असा घ्यावा म्हणजे चळवळीचा मूळ उद्देश साध्य होतो. ही त्यांची विचारसरणी फार आवडली.

वैचारिक प्रगल्भता लाभलेल्या व्यक्तीला मान,सन्मान आणि पुरस्कार अशा गोष्टी अतिशय शुल्लक गौण वाटतात हे त्यांच्या या विचारातून प्रगट झाले. कार्य चंदन आणि कस्तुरी प्रमाणे करावे ते कोणाला न सांगता चहूकडे पसरणारे अतिशय दर्जेदार आणि प्रामाणिक असावे हे देखील त्यांच्या धडपडीतून उमजले.

आज परभणी ते अंबाजोगाई १०७ किलोमीटरचा सायकल प्रवासाचा पहिला टप्पा त्यांनी पूर्ण केला. करम, निळा तालुका सोनपेठ, परळी, अनुराग पुस्तकालय अंबाजोगाई, साहित्य निकेतन ग्रंथालय अंबाजोगाई जे की स्वातंत्र्यपूर्व काळातील त्याची स्थापना आहे अशा ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाच्या वेळी ग्रंथालयातील सर्व सदस्य उपस्थित होते . तसेच आदरणीय विलास काळे सर, सोळंखे सर, जयश्री उत्तरेश्वर औताडे, सौ. जयश्री अर्जुन मुंडे हे उपस्थित होते. या ठिकाणी बालकांशी, साहित्यिकांशी, शिक्षक दादा ताई यांच्याशी वाचनाविषयी, दृष्टिकोन समन्वय आणि समर्पण या वाचन चळवळीच्या गाभ्याविषयी संवाद झाला.

प्रत्यक्ष अप्रत्यक्ष यासाठी सहकार्य मार्गदर्शन करणाऱ्या सर्वांचे हृदयपूर्वक आभार त्यांनी मनःपूर्वक मानले. उद्या पहाटे ते पुढील प्रवासाला निघतील.

नाचू पुस्तकांच्या अंगणी
गाऊ संस्काराची गाणी
परभणी ते कोल्हापूर सायकल प्रवास

वाचनातून आत्मनिर्भरता, आदर, व्यासंग, बांधिलकी, सहवेदना, सेवाभाव, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कर्तव्य परायणता, स्वराज्य, स्वातंत्र्य अशी नीतिमूल्ये पुस्तक वाचनातून रुजावी. बालकांवर वाचनाचे संस्कार व्हावेत. यासाठी हा सायकल प्रवास आहे. वाचनाने मन तर सायकलिंग ने मनगट मजबूत करूया. प्रगल्भ मनाचा माणूस घडावा. या उद्देशाने अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र कार्य करत आहे.

त्यांचा हा दौरा येथून पुढे परळी, रेनापुर, लातूर, औसा, उमरगा, येणगूर, जळकोट, नळदुर्ग, इटकळ सोलापूर, कामठी, इचगाव, मंगळवेढा, सांगोला, जुनोनी, नागज, कवठेमहाकाळ, मिरज, सांगली, जयसिंगपूर, हातकणंगले, कोल्हापूर असा त्यांच्या दौऱ्याचा अजेंडा आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा.

## विशेष लेख...

## भारतीय रेल्वेचे एक अभिनव पाऊल

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पर्यावरण वाचवण्यासाठी आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय रेल्वेने एक नवीन आणि अनोखे पाऊल उचलले आहे.

सोलर ट्रॅक प्रकल्प हा एक अभूतपूर्व प्रयत्न आहे. हा भारतीय रेल्वेने बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स येथे सुरू केलेला एक पायलट प्रोजेक्ट आहे, ज्यामध्ये रुळांमध्ये सौर पॅनेल बसवले जातात. रेल्वे कार्यशाळेसाठी हरित ऊर्जा निर्माण करणे आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स () ने अशी पहिली सोलर पॅनल सिस्टीम बसवली आहे, जी रेल्वे ट्रॅकच्या मध्यभागी बसवण्यात आली आहे. हा एक पायलट प्रोजेक्ट आहे, जो च्या वर्कशॉप लाईन क्रमांक १९ वर सुरू करण्यात आला आहे. या प्रोजेक्टमध्ये ७० मीटर लांबीच्या ट्रॅकवर २८ सोलर पॅनल बसवण्यात आले होते, जे पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानाने बनवलेले आहेत. या सिस्टीमचे वैशिष्ट्य म्हणजे ते सहजपणे काढता येते आणि ते ट्रेनच्या हालचालीत अडथळा आणत नाही.

या सौर पॅनेल प्रणालीची क्षमता १५ किलोवॅट पीक () आहे. हे पॅनेल दररोज ९६० युनिट वीज निर्माण करू शकतात आणि त्याची वीज घनता २४० किलोवॅट पीक प्रति किलोमीटर आहे. याचा अर्थ असा की ही प्रणाली केवळ वीज निर्मितीमध्ये प्रभावी नाही तर रेल्वेसाठी एक किफायतशीर आणि पर्यावरणीयदृष्ट्या फायदेशीर पर्याय देखील आहे. भारतीय रेल्वेकडे १.२ लाख किलोमीटरचे ट्रॅक नेटवर्क आहे आणि जर हा प्रकल्प देशभरात राबविला गेला तर दरवर्षी प्रति किलोमीटर ३.५ लाख युनिट वीज निर्मिती करता येईल. यामुळे रेल्वेच्या विजेच्या गरजा पूर्ण होण्यास मोठी मदत होईल.

विशेष म्हणजे या प्रकल्पासाठी वेगळी जमीन खरेदी करण्याची गरज नाही. हे सौर पॅनेल रेल्वे रुळांमधील रिकाम्या जागेचा वापर करून बसवण्यात आले आहेत. यामुळे केवळ जमीन वाचत नाही तर रेल्वेचा खर्चही कमी होत आहे.

हा प्रकल्प ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने एक सुखद पाऊल आहे. जर हा प्रकल्प १०० मीटरपर्यंत वाढवला गेला तर दरवर्षी सुमारे ३ लाख युनिट वीज निर्मिती करणे शक्य आहे. तथापि, या प्रणालीशी संबंधित काही आव्हाने आहेत, ज्यांचा अभ्यास केला जात आहे. भविष्यात ते मोठ्या प्रमाणात राबविण्याची योजना आहे.


रेल्वेच्या या उपक्रमानंतर लोकांकडून अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. बहुतेकदा पॅनेल चोरीला जाण्याची, मोडतोड पडण्याची आणि खराब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परंतु, सध्या रेल्वेचा प्रयत्न असा आहे की रेल्वेच्या मालकीच्या भागात सौर पॅनेल बसवले पाहिजेत जेणेकरून पॅनेल देखील सुरक्षित राहतील. भारतीय रेल्वे रेल्वेच्या फायद्यासाठी सौर ऊर्जेचा वेगाने समावेश करत आहे. अधिक शाश्वत आणि हरित ऊर्जे साठी, रेल्वे आता जमिनीवर योजना राबवणार आहे. वाहतूक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले जात आहे. याअंतर्गत, देशभरातील च्या प्रयोगांचा समावेश करण्याच्या योजनेवर काम सुरू केले जाणार आहे.

## शाडू माती पासून श्रीगणेश मुर्तीची कार्यशाळा



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**बाणेर** – बुधवार दि.२०/८/२५ रोजी शाडू माती पासून पर्यावरण पूरक श्रीगणेश मुर्ती साकार करण्याची कार्यशाळा स्व.सोपानराव कटके विद्यालय बाणेर येथे संपन्न झाली. त्यात इयत्ता ५ वी ते ८ वीचे सुमारे ४२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुप्रसिध्द मूर्तीकार तथा सेवानिवृत आदर्श मुख्याद्यापक श्रीकांत कुंभार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना श्रीगणेश मुर्ती बनवीण्याचे कौशल्य पुर्ण प्रशिक्षण दिले. ज्या मुळे विद्यार्थ्यात भावी काळात कलात्मक गुणनिर्मीती होईल, संततधार पर्जन्य वृष्टीतही कार्यशाळा नियोजनबध्द पध्दतीत पार पडली.

शाळेतर्फे प्रशिक्षक कुंभार यांचे शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे संकल्पक गीरीधरभाई राठी, प्रकाशजी बोकील, डॉ.श्याम कुलकर्णी, उल्हास चित्रे, राजीवजी साने, अशोकराव अधिकारी, रामधनी काका प्रशालेच्या मुख्याध्यापीका सौ.संगिताताई बंड, तोटे मॅडम व शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते.



## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 23



राशी चक्रामधील आठवी रास सीवृश्चिक'. ही जल तत्वाची रास असली, तरी लाव्हारसा सारखी आतल्या आत कुढणारी आहे. ह्या राशीची जातकं धाडसी असतात. संधी आणि परिस्थिती यांच्या हातात आली की ही माणसं, विरोधकांचा काटा काढतात.

अशी व्यक्ती, राजकारणा सारख्या दलदलीत, त्याच्या "ध्येयपूर्ती" साठी फारच गतीने यशस्वी होतात. ही स्त्रीप्रधान रास असून, तांबडा आणि नारिंगी हे दोन रंग या राशीचे आहेत. या राशीचा स्वामी मंगळ असून आराध्य वृक्ष "खैर" आहे.

'अनुराधा' आणि 'ज्येष्ठा' ही दोन नक्षत्र या राशीचे असून 'विशाखा' नक्षत्राचा काही अंशी प्रभाव या राशीच्या जातकावर पडतो, अनुराधाचा 'नागचाफा' हा आराध्य वृक्ष आणि ज्येष्ठाचा 'सांबर' हा आराध्यवृक्ष आहे. तसेच अनुक्रमे 'मित्र' आणि 'इंद्र' ह्या 'आराध्य देवता' या नक्षत्रांच्या आहेत. या नक्षत्रांच्या, म्हणजे या पूर्वीच्याही राशीं मधील नक्षत्रांच्या एकूण चार चरणांचे स्वामी हे विभिन्न असतात. जिज्ञासु वाचकहो आपण वाचत आला असाल की प्रत्येक राशीला, नक्षत्राला, त्या नक्षत्रांच्या प्रत्येक चरणाला एकेक 'स्वामी' असतो. ह्या, स्वामींचे गुण त्यांच्या 'आराध्य वृक्षांचे गुण, राशींचे गुण अशा सार्यांचा अभ्यास, त्या त्या राशीच्या "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये केला जातो. मग त्या राशी च्या जातकाची, वास्तु कुंडली आणि 'होरा कुंडली, या त्रिवेणी कुंडलीच्या संगमातून फक्त आणि फक्त चांगले - फायद्याचे - लाभाचे आणि यश देणारे आकार, प्रतिके, अक्षरे आणि रंग यांच्या समन्वयातून साकारलेले 'संकल्पन' म्हणजे त्या विशिष्ट राशीच्या जातकाचे 'वास्तुशास्त्र पेंटींग' होय. 'वृश्चिक' राशीच्या जातकाला राशीच्या गुणधर्मानुसार 'डंख' मारण्याच्या स्वभावामुळे मोठ्या नुकसानी सोसाव्या लागतात. या पेंटींगमुळे ही मंडळी संभाव्य धोक्या पासून वाचते...!

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238

## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.



## जात्यावरच्या ओव्या......

---

लाडयाची लेक
लाड घालते बापाले
चांदीचे तोंगल (पैंजण)
सोनं मागती कापाले (कानातले) ||२१९||


कोतवाल दादा
पडदे लाव दुकानले
गवळी दादा महा
राती होता मुक्कामाले ||२२०||

---

*संदर्भ - शांताई इंगळे*
*संकलन - सौ. मनोरमा बोराडे*
*सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर*

# लोकमाता अहिल्याबाई होळकर - भाग २

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

आज आपण स्त्री शिक्षणाबद्दल आणि स्त्री स्वातंत्र्याबद्दल बोलतो. पण या दृष्टीने विचार केला तर अहिल्याबाई या स्त्री स्वातंत्र्याच्या आद्य उद्गात्या होत्या. महत्त्वाचं म्हणजे, त्यांनी राज्यकारभारात स्त्रियांनाही भूमिका दिली. मुलींच्या शिक्षणासाठी व्यवस्था, आणि अनाथ मुलांना मदत केली. त्या स्त्रियांच्या हक्कांबाबतही अत्यंत संवेदनशील होत्या. त्या काळात स्त्रिया अनेक जाचक रूढींनी बांधल्या गेल्या होत्या. विधवा स्त्रियांची अवस्था तर नरकासमान होती. त्यांना पुन्हा सन्मानाने जगण्याचा अधिकार समाजाने द्यावा यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. विधवांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला. विधवांना आपल्या मर्जीप्रमाणे संपत्तीची वाटणी करण्याचा अधिकार दिला. ही त्यांनी घडवून आणलेली एक फार मोठी सामाजिक क्रांती होती.




स्वतः एक विधवा असूनही त्यांनी खंबीरपणे शासनाचा भार उचलला आणि समाजासमोर एक आदर्श उभा केला. त्यांनी समाजातील विधवांसाठीही आश्रम सुरू केले.पहिला शस्त्रकारखाना उभारला. यासारख्या अनेक गोष्टी त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. अशी उदाहरणं त्या काळात दुर्मीळ होती. त्यांच्या राज्यकारभाराची तुलना केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याशीच होऊ शकेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे इंग्रजांची लबाडी ओळखून त्यांना चार हात दूरच ठेवले, तशीच शत्रूला ओळखण्याची दूरदृष्टी अहिल्याबाईंजवळ होती. पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्या इंग्रजांबद्दल म्हणतात, '' इंग्रज गोडबोल्या आणि अस्वलासारखा धूर्त आहे. त्याच्याशी संग करू नका. तो गुदगुल्या करून मारेल. अस्वलाला मारायचे तर त्याच्या तोंडावरच आघात करावा लागतो. ''

लोकांच्या सुखदुःखांशी समरस होणारं संवेदनशील नेतृत्व त्यांनी दिलं. त्या लोकांच्या अडचणी समजून घेत आणि त्यांना मार्गदर्शन करीत. दर वर्षी त्या गावागावात फिरून जनतेच्या अडचणी प्रत्यक्ष पाहत. त्यामुळे प्रजेला त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटत होता. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही त्यांच्या वागणुकीची वैशिष्ट्ये होती. विद्या - कलांची देवी असलेल्या सरस्वतीप्रमाणेच त्या नेहमी पांढरीशुभ्र स्वच्छ अशी नऊवारी साडी परिधान करीत. राजघराण्याच्या प्रथेप्रमाणे डोक्यावर पदर घेत. पती निधनानंतर कपाळावर गोपीचंदनाचा टिळा लावायला त्यांनी सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांच्या सात्विक चेहऱ्यावरील तेज अधिकच खुलून दिसत होते. त्यांचे दर्शन एखाद्या साध्वी सारखे, पाहताच समोरच्या व्यक्तीने नतमस्तक व्हावे अशा प्रकारचे प्रभावी आणि प्रसन्न होते. त्यांचे बोलणे प्रेमळ आण मृदू होते परंतु आपल्या विचारांवर मात्र त्या ठाम असत. खोटे बोलणे, अन्यायाने वागणे या गोष्टींची त्यांना मनस्वी चीड होती.

**(क्रमशः)**

## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

जसे रात्री नंतर दिवस उगवतो अंधार नाहीसा होतो. तसेच एका मूळ स्वरूपातून हे सारे विश्व व्यक्त दशेला येते व पून्हा त्याच स्वरूपात लय पावते. त्या आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की अज्ञान नाहीसे होते. आपण बांधले गेलो आहोत असा अज्ञानातून होणारा भ्रम नाहीसा होतो. आपण विश्वापेक्षादेखील विशाल असताना स्थळ काळांनी वेढल्यामुळे जणूकाय बद्ध आहोत. ते विश्वच मुळीस्वरूपात लीन झाल्याने आत्मज्ञानी पुरूशालाबद्ध पणाची भावना उरत नाही

आत्मज्ञान झाल्यावर हा सगळा विरोध मावळतो. आत्मस्वरूप अनत असल्याने ज्याला ज्या पद्धतीने विषय समजला आहे, तो त्या प्रमाणे मथ मांडतो

आत्मज्ञी पुरूषाच्या अनुभव सर्व समावेशक असल्याने त

याच्या मताला व्यापक व खोलवर विचार विचार केला पाहिजे.

वेदान्ताच्या मते शुद्धज्ञान कसे असते?

अज्ञानाचा मल नसलेले अगदी शुद्ध आत्मस्वरूप या द्रुष्य चराचराचें मूळ आहे असा प्रत्यक्ष अनुभव येऊन जे ज्ञान होते त्यास वेदान्यांमध्ये शुद्धज्ञान असे म्हणतत.


''मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान''

आपण आपल्या मूळ स्थानाचा म्हणजे स्वरूपाचा शोध केला तर आपण स्वस्वरूपाचा शोध केला तर आपण आत्मस्वरूपात जातोसते स्वस्वरूप ज्ञानमय असल्याने तेथे अज्ञान आपोआपच नाहीसे होते म्हणून आत्म्याला मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान असे म्हणतात.

'' मी कोण आहे ?

हे जाणण्याचा हेतु बाळगून जर आपण शोध घेऊं लागलो तर खर मी देहाच्या पलीकडे आहे असा अनुभव येऊ लागतो

# नाम सद्गुरूकडून घेणे श्रेयस्कर !



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम सद्गुरूकडून घेणे जरूर आहे, की ते आपणच आपल्या आवडीप्रमाणे घेतले तरी चालेल ? वास्तविक भगवंताचे नाम स्वत:सिद्ध आहे आणि परिपूर्ण आहे; त्याला दुसऱ्या कुठून पूर्णता प्राप्त करून घ्यायची असते असे नाही. म्हणून, सद्गुरूकडून घेतलेले नाम आणि आपण स्वत:च्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुद्धा, सद्गुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्ट्य आहेच. ते असे की, तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो, आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे, आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून, 'मी नामस्मरण करतो' अशा तऱ्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. सद्गुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते, आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. म्हणून सद्गुरूकडून नाम घेणे जरूर आहे. सद्गुरुभेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे, कारण ते नामस्मरणच आपल्याला सद्गुरूची भेट करवून देईल. तसे पाहता, आधी संताची भेट होणे कठीण; आणि समजा भेट झाली, तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळ्यांना आमंत्रण करावे लागत नाही, ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. 'खडीसाखर बना' म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण, याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सद्गुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.

आता अशा रीतीने सद्गुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की, '' मी ' राम, राम ' असे म्हणत होतोच, आणि आता सद्गुरूने तेच सांगितले; तर मग यात काय मोठे झाले ? '' पण यातच विशेष आहे, कारण यात ' मी कर्ता ' हा अभिमान टाकावा लागतो. सद्गुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्तेपणाच्या अभिमानाला वाव रहात नाही. मिठाचा एकच खडा खीर नासवायला पुरेसा होतो, त्याप्रमाणे अभिमान हा सर्व साधन नासवायला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान टाकणे ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते. भगवंताचे नाम हे औषध समजावे; भगवंताची प्राप्ती हे त्याचे फळ; जरूर तेवढेच करणे, म्हणजे सांगितलेले तेवढेच करणे, जास्त न करणे, हे त्याचे अनुपान समजावे. औषध मात्र थेंबथेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे.

२. साध्या शब्दांचासुद्धा आधार मोठा असतो. मग भगवंताच्या नामाचा आधार केवढा मोठा असेल.



## आरोग्य संजीवनी

# लेमन टी / लिंबू-चहा

**ज्योतिर्मय साहित्य**

मात्र त्यामुळे ब्लॅक टी, लेमन टी/लिंबू चहा यांसारख्या गोष्टींची मागणी वाढली. लेमन टी बनवणे सोपे असून तो शरीराचा क्लिंझर म्हणून उपयुक्त ठरतो. आता यामध्ये असे कोणते घटक असतात ज्याचे आरोग्याला फायदे होतात. याबाबत फारच कमी जणांना माहिती असते.

लेमन टी म्हणजे नेमके काय?....

लेमन टी म्हणजे कोरा चहा ज्यामध्ये लिंबू पिळलेले असते. लिंबामुळे या चहाला वेगळी चव येते. यामध्ये पाणी, चहा, खडीसाखर किंवा मध आणि लिंबू इतकेच असते. चहात लिंबू पिळल्याने त्याची केवळ चवच नाही तर रंगही बदलतो. कोरा चहा कोमट झाल्यावरच त्यात लिंबू पिळावा आणि मध टाकावा, गरम असताना या दोन गोष्टी टाकू नये याची विशेष काळजी घ्यावी.

क्लिंझर आणि डिटॉक्सिफायर

शरीरातील अनावश्यक टॉक्सिन्स बाहेर पडण्यासाठी लेमन टीचा उपयोग होतो.

याबरोबरच शरीरात असणारे विविध संसर्ग आणि आजार दूर होण्यासही लेमन टी उपयुक्त ठरतो.

सर्दी आणि तापावरील उपचार

लेमन टीमुळे सर्दी आणि ताप कमी होण्यास मदत होते. या चहाचा जास्त उपयोग व्हावा यासाठी यामध्ये थोडे आले टाकल्यास फायदा होतो. असा आले घातलेला चहा घेतल्यास घसेदुखीवरही आराम मिळतो. तसेच यामुळे प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. तसेच पावसाळी वातावरणात वाजणारी थंडी यामुळे कमी होण्यास मदत होते.

नैसर्गिक अँटीसेप्टीक

लिंबामध्ये निसर्गत: अँटीसेप्टीक गुण असतो. लेमन टीमध्ये अँटी बॅक्टेरीयल आणि अँटी व्हायरल घटक असतात. त्यामुळे एखाद्याला आधीपासून काही इन्फेक्शन किंवा आजार असतील तर ते बरे होण्यास मदत होते.

त्वचेसाठी उपयुक्त

आपली त्वचा छान नितळ असावी असे आपल्यातील बहुतांश जणांना वाटते. लिंबामध्ये व्हिटॅमिन सी असते, जे त्वचेसाठी अतिशय उपयुक्त असते. तसेच लिंबामध्ये ॲस्ट्रींजंटचे घटक असतात. त्यामुळे चेहऱ्यावरील पुरळ कमी होण्यास तसेच त्वचेच्या समस्या कमी होण्यास मदत होते...

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

अधिकचे फायदे....

१. लेमन टी मुळे पचनसंस्था निरोगी राहते. शरीरात उर्जा निर्माण होते. दिवसभर तजेलदार दिसू शकता.

२. दिवसातून ३-४ वेळा लेमन टी प्यायल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते. कोलेस्टरॉल कमी होते.

३. यातील व्हिटॅमिन-सीमुळे मुरूमे आणि काळे डाग कमी होतात. यात मध आणि खडीसाखर टाकून घेतल्यास चेहरा तजेलदार दिसतो.

४. सकाळी उठल्यावर योग, सूर्यनमस्कार, व्यायाम करण्याआधी लेमन टी प्यायल्याने वजन कमी होते. भुक ही नियंत्रित राहते.

५. पचनसंस्थेचे शुद्धीकरण होते. टॉक्सिन्स शरीराबाहेर पडतात. पोटाचे कोणतेही विकार होत नाहीत.

६. तसेंच यात आले टाकून दिवसातून ३-४ वेळा घेतल्यास सर्दी बरी होते.

७. घशाची खवखव, खोकला बरा होतो.

८. सोबतच मध टाकून घेतल्यास श्वसनाचे आजार होत नाहीत.

९. कायम पोट साफ राहते.

१०. ताणतणावामुळे होणारी डोकेदुखी, थकवा, सुस्ती नाहीशी होते.

***

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

# जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग तीन)

**ज्योतिर्मय साहित्य**

२ रा प्रयोग : साक्षीभावाने राहणे

साक्षी भावाने (अवचेतन मनाने) राहणे म्हणजे नियंत्रित होणे हा हा प्रयोग आहे. आपले बाह्यमन कितीही उड्या मारो, त्याकडे केवळ साक्षी भावाने पहायचे. असे करत गेले की मन हे तादात्म्य पावते. समजा डोके दुखते तर मनास वाटते आपलेच दुखते हा तादात्म भाव कमी करणे.

राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते हे बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षी भावाने राहणारे मन हे अभिव्यक्त ही करत नाही

हा हा प्रयोग आहे. घडणाऱ्या प्रसंगाला त्रयस्थ नजरेने पाहायचे. याला साक्षी भाव असे म्हणतात.

मीच मग राखण झालो हे राखण करणारे तिसरे मन अंतर मन वेगळे आहे राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते ही बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षीभावाने राहणारे मन हे अभिव्यक्तही करीत नाही. तुकाराम महाराज यांना जेव्हा त्यांच्या बायकोने ऊसाने मारले तेव्हा, त्यांना तिचा राग आला नाही. तो त्यांनी व्यक्तही केला नाही, आणि दमन ही केला नाही. तर त्यांनी या घटनेकडे केवळ साक्षी भावाने पाहिले. हा देह मला वापरण्यासाठी दिला आहे पण तो देह म्हणजे मी नव्हे.या देहास येणारा सुख दुःखाचा अनुभव हा त्रयस्थ नजरेने पाहणे यालाच साक्षी भाव म्हणतात.

३ रा प्रयोग : राग आल्यावर आरशासमोर उभे रहा* व कल्पना करा की, आरशातील प्रतिमा म्हणजेच आपणास ज्याचा राग आला ती व्यक्ती आहे. आता राग व्यक्त करा. राग कमी होईल. मग हसू येईल. मग लक्षात येईल, रागात असताना देखील, मनाचे एक केंद्र असे होते की, जे शांत होते.

४था प्रयोग : आरशासमोरील प्रयोग पुन्हा काही वेळानंतर पुन्हा पुन्हा आठवणे मनावर झालेले घाव आशा क्रोध करून संपवता येतात.

५ वा प्रयोग : सामूहिक हास्य करणे घरातील कोणी व्यक्ती रागात आली की इतर सर्वांनी सामूहिक हास्य करावे. हळूहळू राग शांत होईल.

६वा प्रयोग : केवळ मनाने विकार उपभोगून घ्या व साक्षी भावनेने हे म्हणून नाट्य तपासून घ्या हळूहळू विकार कमी होतील थोड्या थोड्या गोष्टीने जर तुम्हाला राग येत असेल तर ,तुम्ही बाह्य वस्तू व्यक्तीच्या हातातील खेळण्यात तुम्ही प्रतिक्रियावादी झालात. काहीतरी होते त्याची प्रतिक्रिया तुम्ही लगेच देता. क्रिया नाहीच केवळ प्रतिक्रिया होते. संताच्या क्रिया असतात प्रतिक्रिया नाहीत.

७वा प्रयोग : तुमची चेतना बाहेर जास्त वाहते. असे सतत करत गेल्यास तुमची किरणे नष्ट होतात. तुम्ही रिक्त होता. म्हणून तुमची अंतरमुखी चेतना वाढली पाहिजे. प्राणप्रवाह उर्ध्व झाला पाहिजे. नऊ द्वारातून बाहेर वाहणारी चेतना आत वळली पाहिजे. *ध्यान केल्याने बाहेर जाणारी चेतना परत आत घेता येते.

मनाचे चार खंड आहेत जागृती स्वप्न सुशुप्ती आणि तूर्या मनाला तूर्येत ठेवा मन थकूच देऊ नका शरीर थकू द्या.

८ वा प्रयोग : सूक्ष्म शरीरावर ध्यान करा व त्यातून निळा प्रकाश बाहेर येतो अशी कल्पना करा. मनाच्या शक्ती विखुरलेल्या असतात. अनेक विषयावर मन फिरत राहते. मनात चंचलत्व असते व त्याच्या शक्ती विखुरल्या जातात. मन केंद्रित करा. एकाग्रते कडून समाधीकडे जाण्यासाठी मन प्रसन्न हवे. साधकाला मनाची एकाग्रता करता यायलाच पाहिजे. एक काम एक विचार. *भूतकाळ व भविष्यकाळात न जाता मन हे वर्तमान काळातच ठेवता यायला हवे.

व्यक्ती विषय व वस्तू याविषयीची अनुकूलता म्हणजे संसारीक सिद्धी. यशस्वी होण्याचे गमक म्हणजे संकटातही प्रसन्न राहणे. प्रसन्न मनात प्रभु चेतना आकार घेते. म्हणून ''तू हे मन मी ची करी''अशी ओवी आहे. भगवंताचे मन प्रसन्न असते, त्याप्रमाणे आपलेही मन प्रसन्न करा. असेच सांगितल्या जाते.

मनावर येणारा ताण कसा कमी करायचा याचे अध्यात्मिक आणि वैज्ञानिक प्रयोग आज आपण पाहिले अभंगाचा उत्तरार्ध पुढील भागात आपण पाहूयात.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

३८. भक्ती

अंबे तुझिया चौकटी। रगडिती जे नाकटी।।
त्यांचिया पाय भूकटी। लावी जो भाळपाटी।।
नुरतसे आडकाठी। त्याचिया मुक्तीपाठी।।
बसता भवाची रट्टी। हास मायेच्या चौकटी।।

३९. विनवणी

अंबे आता कोणी नाही। तुझ्यावीण माझा त्राता।
नको नको फिरवू कुठे। देई पायी जागा आता।।
दाविलेसी जगरूपा। मारितसे ते गं थापा।
माते दाखविसी जगा। तुझ्या कृपे मी सनाथा।
चंद्रहास म्हणे माये। घेई कडेवरी आता।।

४०. विनवणी

दास मी तुझ्या पायीचा। नको आसरा कोणाचा।
सर्व सुखे तुझे ठायी। नको पसारा मोहाचा।।
नित्य राही तू अंतरी। तुझा शब्द गं धीराचा।
ऐसी स्मरावी गं गीते। शब्द माये अधीराचा।।
गातो गीत नित्य तुझे। नाही भाग इंद्रियाचा।
चंद्रहास म्हणे माझा। शब्द आहे अंतरीचा।।

## ॥ श्री राम कथा ॥





*वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर*

**ज्योतिर्मय साहित्य**

आता समुद्राला ओलांडून पुढे कसे काय जायचे?रामास असे वाटले की समुद्र आपला पूर्वज आहे.तो रस्ता देईल. त्याची वाट पाहिली पण तो रस्ता देईना. एखाद्या गृहस्थाश्रमी व्यक्तीचे चरित्र असे ते प्रदर्शित केले आहे. त्यांच्या जीवन संबंधाने जो जो विचार झाला तो तो आपल्या कल्याणासाठी आहे.मनुष्य म्हणून आपण जन्माला आलो हे आपले प्रारब्ध आहे तसे आम्ही जन्मली त्याचा भाऊ ही करणे नको. आपण जगात कल्याणार्थ सर्व शक्य प्रयत्न आपण केले पाहिजेत. प्रसंगाने आपण कसे वागावे. आनंदाने हुरळून जाऊ नये तसेच दुःखाने कोलमडू नये हे या कथेतून आपण पाहू शकतो. मारुती राय लिंक्स जातात. सीता मातेचा शोध घेतात. लंका पेटवून यात. जिथे युद्ध होणार ती जागेचे अवलोकन ते करतात. ते पू हा सीतेला भेटतात. सीता माता म्हणतात.राम एव्हढा मोठा समुद्र कसा ओलांडून येतील असा संशय त्या हनुमंता जवळ बोलून दाखवितात.हनुमान त्यांचे आत्म बाळ वाढवितात. राम प्रभू समर्थ आहेत ते नक्कीच मार्ग काढतील मी ही त्यांना उचलून आणू शकतो अशा रीतीने त्यांनी सीतेचे मनोबल वाढविले. सीतेला हनुमान चे वीरत्व. पटले होते.त्यांनी बाळाने वृक्ष उचलून फेकले होते लंका जाळली,राक्षसांना मारले रावणाचा पुत्र मारला. यामुळे सीतेला संशय येणे काळजीचे होते. गीतात द्रुत राष्ट्राच्या मनात संशय निर्माण झाला नाही तसा तो संजयच्या मनात देखील नव्हता.कारण धृतराष्ट्राला कांहीच माहीत नव्हते तसे समजायला सर्व माहिती होते त्यामुळे समजायचे शंकेचे निरसन होणे गरजेचे होते. **(क्रमशः)**

*कथा ऐकता ऐकता धावते संकलन*
*मधुकर बोरीकर, 9403061886*


## फुलमाला....




मॉर्निंग ग्लोरी (नीलपुष्पी)

पहाटे पहाटे उमलते म्हणून या फुलांचे मॉर्निंग ग्लोरी हे नाव
सुंदर रूपगंधामुळे हे सहज कोणाच्याही घेते मनाचा ठाव
एक दिवसाचे आयुष्य या फुलांचे पण ही वेल भरभरून बहरते
घरावर हिला चढविली तर नेत्र सुखाबरोबर गारवाही देते
हृदयाच्या आकारासारखे या वेलीचे असते सुंदर पान
मधमाशा,फुलपाखरे यांचे हे फुल आवडते
आयुर्वेदात याला मान

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## मैत्रीपर्व : गुरुदेव आणि महात्मा गांधी

गुरुदेव आणि महात्माजी यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होते परंतु या महापुरुषांनी आपले मनभेद त्यामुळे कधीही होऊ दिले नाहीत. केवळ चरखा चालवून आणि सूत कातून शेतकरी स्वावलंबी होणार नाहीत आणि स्वराज्य मिळणार नाही. समोर कुठलातरी विधायक कार्यक्रम असल्याशिवाय शाळा कॉलेजवर तरुणांनी सरसकट बहिष्कार टाकू नये. नंतरच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उतरावे नाहीतर ते विध्वंसक बनतील असे गुरुदेवांचे मत होते. १९२२ च्या आंदोलनात सत्याग्रही हिंसक झाले आणि त्यांनी चौरीचौरा येथे एक पोलीस चौकी जाळली आणि गुरुदेवांच्या या विचारांचे प्रत्यंतर आले. अर्थातच गांधीजी सुद्धा या गोष्टीमुळे व्यथित झाले आणि त्यांनी हे आंदोलन मागे घेतले.

गांधीजी जेव्हा जेव्हा उपोषणाला बसत तेव्हा त्यांच्या प्रकृतीचा विचार मनात येऊन गुरुदेव काळजीत पडत. पुण्यात जेव्हा येरवड्याच्या तुरुंगात गांधीजींनी जेव्हा उपोषण सुरू केले तेव्हा त्यांची काळजी वाटून त्यावेळी ७२ वर्षे वय असलेले गुरुदेव त्यांच्या भेटीसाठी धावून गेले. यावेळी गांधीजींनाही त्यांचीच आठवण येत होती. आणि गांधीजींच्या मनात त्यांच्या कवितेच्या ओळी घोळत होत्या.


जीबॉन जॉखॉय शुकाये जाय
कोरूणाधाराय एशो
शकल माधुरी लुकाये जाय
गीतोसुधारशे एशो.

(जीवन जेव्हा सुकुनि जाते करुणाधारा होऊनि ये सकल माधुरी लोपून जाता गीत सुधारस होऊनि ये )

गुरुदेवांच्या कवितेतील हे धीर देणारे शब्द त्यावेळी गांधीजींनाही जणू धीर देत होते. गांधीजींनी त्याही अवस्थेत गुरुदेवांना हे गीत म्हणण्याची विनंती केली आणि त्या ७२ वर्षांच्या वृद्ध कवीने त्यांचे हे म्हणणे लगेच मान्य केले.

गुरुदेव आणि महात्माजी हे दोन्हीही भारतमातेचे थोर सुपुत्र. त्या दोघांच्या विचारसरणीत काही बाबतीत किरकोळ मतभेद असले तरी त्या दोघांमध्ये समानतेचा एक मोठा धागा होता आणि तो म्हणजे सर्वसामान्य भारतीय माणसाबद्दल त्यांना वाटणारी आत्मीयता. तशी दोघांचीही कार्यक्षेत्रे वेगळी होती. राजकारण हे गांधीजींचे कार्यक्षेत्र तर साहित्य आणि संस्कृती हा गुरुदेवांचा प्रांत. पण आपल्याला कोणते कार्य करायचे आहे याबाबत दोघांच्याही विचारांमध्ये स्पष्टता होती. मार्ग वेगवेगळे असले तरी मातृभूमीच्या उद्धारासाठी आणि विकासासाठी दोघेही झटत होते.

(क्रमशः)




# ॥ जेष्ठांना हवी सन्मानाची संध्याकाळ ॥

ज्योतिर्मय साहित्य

जेष्ठ नागरिक हा समाजाचा महत्वाचा घटक आहेत आणि त्यांची काळजी किंवा त्यांना मिळणाऱ्या सुविधा यांकडे,कौटुंबिक, सामाजिक आणि शासन-प्रशासनाचे,त्या त्या पातळीवर लक्ष असणे खूप महत्वाचे आहे.जेष्ठनागरिक हे देशाची संपत्ती आहे असे म्हटले जाते. तर ज्या घरात आजी-आजोबा आहेत ते घर मंदिर असते असे म्हणतात. दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस जागतिक जेष्ठनागरिक दिवस म्हणून साजरा होतो.

'म्हातारपणाचा काळ'कठीणच असे उद्गार आपण अनेकदा ऐकतो आणि त्यावर वृद्धांच्या मानसिकतेला गृहीत धरतो. परंतु आपण एक गोष्ट बऱ्याचदा पाहतो ती म्हणजे काही जेष्ठ मंडळी त्यांच्याहून वयाने लहान किंवा पुढील पिढीतील मंडळींसोबत मिळून मिसळून वागत असतात. आपल्यामुळे अजून कोणी दुःखी होऊ नये असेच त्यांना वाटत असते.हे त्यामागील कारण असते.निवृत्तीनंतरचीअर्थातच आयुष्याचे संध्याकाळी अनेक स्वप्न त्यांनी बघितली असतात. निवृत्ती नंतर काही करायचे ठरविले असते. पण शारीरिक,कौटुंबिक समस्यामुळे ते कितपत पूर्ण होतात शंका असते. त्यांच्या वयानुसार आणि कौटुंबिक स्थितीनुसार त्या वेगवेगळ्या असतात.

कुठे तरुणपिढीशी संघर्ष असतो,तर कुठे जेष्ठांचा हेका असतो.हेच ते ''जनरेशन गँप'' दोन पिढ्यातले अंतर म्हणतात ते असते.

मुळात ज्येष्ठ नागरिकांनी नव्या पिढीकडे मोकळा दृष्टिकोन ठेवून पाहिल्यास आणि तरुणांनीही त्यांना समजून घेतल्यास समस्यांची तीव्रताही कमी व्हायला होते. व्हायला हवी.

साधारणपणे ५८ ते ६५ वयोगट,पासष्टी करतात. ६५ ते ७५ वयोगट,पंचेहत्तरी म्हणजे अमृत महोत्सव, आणि ७५ आणि त्यापुढील वयोगट,८१ व्या वर्षी सहस्त्र चंद्रदर्शन करतात.

आर्थिक सुबत्ता, वैज्ञानिक संशोधन, आधुनिक उपचार पद्धती यामुळे काही वर्गात वयोमर्यादा वाढली आहे, त्यामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील वाढली आहे.आज विचार करता आपल्या देशाची लोकसंख्या एकशे पस्तीस कोटी जवळपास आहे.त्यात चौदा ते पंधरा कोटी जेष्ठ नागरिक आहेत.

पंधरावीस लाखाचे संख्येच्या साठी स्वतंत्र मंत्रालय, मंत्री आहे.पण चौदा पंधरा कोटी जेष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडवणे साठी, ना आयुक्तालय,ना मंत्री, ना मंत्रालय.

पण वाढत्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे.

या समस्यांचेही आर्थिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक अशा स्वरूपाच्या या समस्या असतात. वार्धक्यामुळे शरीर थकले असते आणि त्यातच शारीरिक व्याधी मागे लागतात. शारीरिक व्याधींसाठी वैद्यकीय उपचारांची गरज असते.

१ ते २५ वर्ष,२५ ते ५० वर्ष, ५०ते ७५ वर्ष, ७५ते १०० वर्ष,असे ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, त्यानंतर संन्यास अशा या पायऱ्या आहेत .

काही ज्येष्ठ नागरिक वानप्रस्थाश्रमाच्या पुढे गेलेले असतात, पण त्यांची जीवनासक्ती संपलेली नसते. खाणं, पिणं, कपडालत्ता, दागदागिने, प्रवास, लग्न, मुंज, सणवार अशा सर्व गोष्टींत त्यांना रस असतो, उत्साह टिकून असतो.स्वतःचे छंद,शौक,पुरवून घेताना ज्येष्ठ मनोमन स्वत:ची तरुण पिढीशी तुलना करतात. बरोबरी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होतो.अर्थातच ते काही वाईट नाही.जीवन रसमय आहे.

आपल्याला आवडणारे उद्योग, छंद त्यांनी जोपासायचा प्रयत्न करावा. यातून त्यांचा उत्साह कायम राहून राहिलेले आयुष्य जगण्यासाठी बळ मिळते.या जन्मवर या जगण्यावर शतदा प्रेम करावे.

पण आता काळ बदलला आहे. आपल्या काळातील उदाहरणे देऊन, तुलना करण्याचे टाळावे, आमच्या वेळी असे होते,आम्ही असे जगलो, वगैरे दाखले देण्याचे टाळावे. काळ बदलला आहे,त्या बदलत्या काळाला स्वीकारले पाहिजे.त्या बदलत्या प्रवाहात बरोबर जायला लागते.

जेष्ठांनीही वयोभान ठेवणे गरज आहे. तरुणपिढीनेही त्यांच्या वयाचा, अनुभवाचा आदरच करायला हवा.आज आपण जे आहोत ते त्यांच्या मुळेच.नकळत कुठे त्यांचे मन दुखावले जाणार नाही,हे लक्षात ठेवायला हवे.ते सांगतात ते प्रेमा पोटीच.ही भावना लक्षात घ्यावी म्हणजे संघर्ष टळतो.

आपल्या आयुष्याची संध्याकाळ ही कुठे व कशी होणार? याचा अंदाज कोणीच बांधू शकत नाही. त्यामुळे सगळ्याशी चांगले वागा. आपण एखाद्याशी जसे वागतो तसेच आपल्याशीही लोकं वागतात. . आपण केलेली कर्म परत फिरून कधी ना कधी आपल्यासमोर उभी राहतातच,परतफेड होते. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही, आताच विचार करावा, चांगली कर्म करत राहावे.सदगुरु ,परमेश्वरी कार्य करत रहावे. हा कर्माचा सिध्दांत आहे.



पुर्वीच्या काळी घरातील सर्व महत्वाचे निर्णय हे घरातील वृद्धच घ्यायचे. त्यांना एक मान असायचा. घरातील सदस्यांना त्यांची आदरयुक्त भीतीही असायची. परंतु विभक्त कुटुंबपद्धती आपल्या संस्कृतीत रुजू लागल्यापासून घरातील सगळी सूत्र ही कुटुंबातील कमवत्या तरुण मंडळींच्या हाती आली.अनेक घरात सासू -सुनांचे पटत नाही.किरकोळ गोष्टींचे भांडवल होते.कारण एकच असते,मुक्त रहाण्यावर बंधन वाटते,त्यांचा भार वाटतो, परिणामी आता, घरातील आजी-आजोबा हे नावापुरतेच उरले, काही ठिकाणी त्यांची रवानगी गावाला करण्यात आली तर काहींनी तर त्यांना थेट वृद्धाश्रमात पाठवले जाते.



दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

आजची परिस्थिती अशी आहे-दोन-दोन मुले आहेत पण एकटा जबाबदारी घेत नाही, आज इथे उद्या तिथे वाटणी करुन घेतात.आई एकाकडे, वडील दुसऱ्या कडे.

ज्यांना दोन/तीन. मुलीच आहे तर कोणती एक मुलगी आई वडिलांचा सांभाळ करत नाही,काही दिवस एकीकडे तर काही दिवस दुसरीकडे. स्थैर्य नाही.आपली संपत्तीचे वाटप कसे करणार ह्याची कुरबरी मुलींच्यात मनोमनी असते.

कुठे मुले आहेत पण ते परदेशात नोकरी करतात, आर्थिक प्रलोभनात तिकडेच स्थाईक होतात.दुरूनच प्रेम दाखवतात. ना सुखात ना दुःखात सहभाग असतो.सत्तरीच्या घरात आई- वडिल. आजारपणात शेजारी येतात कामाला. काही मुले वृध्दाश्रमात आईवडीलांना ठेवतात.ते परदेशात असतात. केव्हातरी ते येतील, आपल्याला घेउन जातील ही मनात वेडी आशा धरुन असतात,पण अगदी त्यांच्या मृत्यूनंतर देखील त्याना यायला वेळ नसतो. वृध्दाश्रमात अन्त्यविधी करायला सांगतात, पैसे पाठवितात.कारण सहवासातले प्रेम कधीच आटले असते. असेही उदाहरण आहेत.ही सत्य परिस्थिती आहे.

घरात जेष्ठ व्यक्ती भार होऊ लागल्यामुळे आज परिस्थितीत वृध्दाश्रमात वृध्द कमी आणि जेष्ठ नागरिकांची संख्या वाढू लागली आहे.आणि मग घरात मुलांना सांभाळण्यासाठी आजी आजोबा नाही,त्या मुलांची रवानगी पाळणाघरात होते. त्यामुळेच पाळणाघराची संख्याही वाढतेय.

एकीकडे आई वडिलांचा मान राखावा लागतो,

तर,पत्नशीही जुळवून घ्यावे लागते.मुलांना तारेवरची कसरत करावी लागते.

मुले सांभाळ करतच नाही असे नाही. अपवाद असतोच.प्रेमाने राहणारी कुटुंब आहेत.पण काळा बरोबरच परिस्थिती झपाट्याने बदलतआहे.जबाबदारी नकोय. आणि बंधनेही नकोय. आईवडीलांची संपत्ती असेल तर सांभाळतातच हे सांगायला नको.

जेष्ठां साठी अनेक योजना/सवलती आहेत.त्या पुरेशा नाहीत.

जेष्ठांसाठी बस भाड्यात पन्नास टक्के सवलत आहे.पण आसन व्यवस्था नाही. रेल्वेत चाळीस टक्के सवलत,विमान भाड्यात सवलत आहे.बँकेत अर्धा टक्का व्याज जास्त मिळते. काही ठिकाणी वृध्दश्रमात सोय होते.विनामूल्य.अनेक सरकारी योजना आहेत. पण त्या पुरेशा आहे का? श्रावण बाळ योजना रक्कम अल्प आहे.वय वंदन योजनेत १५ लाखाची गंतवणूक करून दहा हजार पेन्शन.ह्याला पेन्शन म्हणावे का? हे तर व्याज आपल्याच रकमेचे.

असलेल्या योजनांची अंमलबजावणी होते का? हा आढावा घ्यायला हवा.

अगदी काही वर्षापासून इपीएस.९५. पेन्शन साठी चाललेला जेष्ठ नागरिकांचा लढा.अगदी पाचशे सातशे, सतरा-अठराशे पेन्शन मिळते.अजूनही दहा हजार तरी पेन्शनची मागणी मान्य होत नाही.कित्येक पेन्शनरचा मृत्यू झाला.ते एकटे पडले आहे.

सरकार हज्जारो कोटी,लाखो कोटी अनेक अनावश्यक बाबीवर खर्च करते,पण ह्या बाबतीत सहानुभूतीने बघत नाही. त्यासाठी लाचारीने त्यांना वारंवार विनवण्या कराव्या लागत आहे. मंत्री, खासदार,आमदारांचे पेन्शन, भत्ते ज्या तत्परतेने वाढवण्याची कार्यवाही झाली तसे का होत नाही.

अर्थतज्ज्ञ अनिल बोकील भाषणातून व्यक्त होतात.अर्थातच ते सरकारला उद्देशून आहेत.''वयाच्या साठी पर्यंत सर्वच नागरिकांनी, सरकारला जे जे द्यावयाचे ते दिले.प्रत्येक गोष्टीवरचा कर दिला.देशाच्या उत्पन्नात त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या निवृत्ती नंतर सरकारची जबाबदारी आहे. जेष्ठनागरीक ही देशाची संपत्ती आहे. प्रत्येकाने ह्या देशाला दोन- तीन नागरिक दिले आहेत.सरकारने ह्या जेष्ठनागरिकांना राष्ट्रीय संपत्तीचा दर्जा देऊन दहा हजार रुपयांचे दरमहा मानधन द्यावे.ही मागणी नाहीतर प्रस्ताव आहे''.

जेणे करुन त्यांच्या आयुष्याची संध्याकाळ सन्मानाची व्हावी......! तर मग....

असा हा जागतिक जेष्ठ नागरिक दिन साजरा करीत असताना त्यांच्या समस्यांचा कौटुंबिक, सामाजिक, आणि शासकिय स्तरावर विचार होणे,अत्यावश्यक आहे.

सर्व जेष्ठनागरिकांना जागतिक जेष्ठ नागरिक दिनाच्या शुभेच्छा..!!!

# रोगराई,महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!!!

ज्योतिर्मय साहित्य

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४०वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात.असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ''ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत'' अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते ''माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत''अशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून ''बडगा'' काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी

रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर



मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही.परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विग्घ निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले.मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ,शहरातील खड्डे,पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज,भ्रष्टाचारी, अत्याचारी,बेरोजगारी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४० कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

***



# बैंदूर.. बैलपोळा



**ज्योतिर्मय साहित्य**

माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पानी जातं गुलाब, जाईजुई, मोगरा फ ुलवीतं..

दुरून कुठूनतरी कानावर हे गोड,अजरामर गाण्याचे मंजुळ स्वर कानावर आले आणि मन एकदम बालपणात गेलं.गावाकडील शेतातील विहिरीजवळ मोठ्ठया आंब्याच्या झाडाखाली सावलीत तासनतास बसून हिरव्यागार मळ्यात वाऱ्याच्या छोट्याशा झुळूकीच्या तालावर ती डोलणारी,नाचणारी नाजूक रंगीबेरंगी फुले, पाने पाहताना. मन कसे हरखून जायचे! बाजूलाच असलेल्या मोठ्ठ्या दगडी विहीरीवर असलेल्या भक्कम लाकडी रहाटावर लावलेल्या मजबूत दोराला बांधलेला मोट ,त्याला जुंपलेला सर्जाराजा आठवला की इतके मस्त वाटते? त्याने पाण्याने भरलेली मोट ओढतानाचा तो लयबद्ध आवाज अजूनही कानात घुमतोय.

ती पाण्याने गच्च भरलेली मोट जेंव्हा पाटात भराभर रिकामी होते तेंव्हा मला जणु भगीरथाने स्वर्गातून भुलोकी आणलेल्या गंगेचा भास व्हायचा खळखळ आवाजामुळे.आता त्याजागी इंजिन बसवले पण ते चित्र मात्र अजूनही तसेंच जिवंत आहे अजून मनात. खरे सांगू का, त्यावेळी सर्जाराजाचे कष्ट थोडेसे कमी झाले म्हणून मला खूप आनंद झाला होता. या शेतात येतानासुद्धा उंच्यापुऱ्या, पांढऱ्याशुभ्र जीवा आणि शिवाची खिल्लारी बैलांची जोडी सुंदर गाडीला जोडलेली असायची. त्यात बसून त्यांच्या गळ्यातील घुंगरांचा खुळखुळ आवाज ऐकत ऐकत येताना खूप मज्जा यायची पण पाठीचा खुळखुळाही व्हायचा. आता त्यांची जागाही जीप,गाड्यांनी घेतली. शेतातील कामातील बलरामाच्या नांगराची जागा ट्रॅक्टरने,अत्याधुनिक यंत्रांनी घेतली खरी, पण काळीभोर माती नांगरणारी ढवळ्या-पवळ्याची जोडी अजूनही मनात घर करून आहे. काळाच्या बदलत्या प्रवाहनुसार आता रंगीत बैलगाड्या, बैल यागोष्टी अँटिक, शोपीस म्हणून


बऱ्याच ठिकाणी विशेषतः गावाबाहेरील ढाबे, हॉटेल्स बाहेर रंगवून ठेवलेल्या दिसतात. पूर्वीपासूनच लग्नातील रुखवतात बैलगाड्यात सर्व धान्यांची छोटी छोटी पोती करून ती भरून लेकीला देण्याची प्रथा मात्र अजूनही बरेच ठिकाणी दिसते, ते पाहून मन सुखावते.

हल्ली शहरातील मोठमोठ्या रिसॉर्ट्स मध्ये खास आकर्षण म्हणून, खेड्यातील आनंद मिळावा म्हणून भेटीस आलेल्या लोकांना या बैलगाडीतून चक्कर मारली जाते. त्यासाठी अजूनही बैलांना काम मिळते आहे याचा आनंद वाटतो. कारण कष्ट करणाऱ्याना आयते बसून खाणे ही खरंच शिक्षाच वाटते.

आपली भारतीय संस्कृती ही अनेक धार्मिक, सांस्कृतिक रूढी-परंपरा जतन करत उत्साहात सणवार, उत्सव साजरा करण्यासाठी अवघ्या विश्वात प्रसिद्ध आहे. यात धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक उत्सवांसोबत सर्वांत महत्वाचे म्हणजे भावनांना विशेष महत्व देते. म्हणूनच निसर्ग, त्यातील असंख्य रूपांची म्हणजेच अगदी माती पासून त्यात उगवणाऱ्या धान्याचे, पशु पक्षी.. प्राणीमात्रांचेही महत्व ओळखून त्यांच्या विषयी आदर ,कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीही अनेक उत्सव तितक्याच श्रद्धेने

धुमधडाक्यात ,मनापासून साजरे करतात. जसे मातीपासून बनलेल्या सुगडांची संक्रांतीला पूजा करतात. कोणत्याही धार्मिक कार्याची सुरुवात कलश पूजनाने केली जाते. म्हणजेच त्यात मातीचा किंवा धातूचा घट ,त्यात आंब्याची किंवा विड्याची पाने म्हणजेच निसर्गातीलच पानांची , त्यात घातलेल्या पाणी म्हणजेच जीवनाची पूजा केली जाते.

भारतीय संस्कृतीत अनेक सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जाते. यापैकीच आपल्या मातीतील प्राण्याशी निगडित एक सण म्हणजे बेंदूर. अन्नधान्य पिकवून आपले पोट भरून, सर्व गरजा भागवणाऱ्या या मुक्याप्राण्याचे आभार मानावे तितके कमीच ! शिवाय बैल हे शेतकऱ्यांच्या शेतीकामात एक अविभाज्य घटक आहेत. ते शेतीची नांगरट, पेरणी, कापणी अशा अनेक कामांमध्ये मदत करतात. त्यामुळे, बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे

सणाचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र आणि देशभरातील विविध राज्यांमध्ये हा सण श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या दिवशी साजरा केला जातो. मात्र, प्रदेशानुसार हा सण साजरा करण्याची पद्धत आणि दिवस बदलत असल्याचे पाहायला मिळते.

मनुष्य हा मुळातच भावनाप्रधान असल्यामुळे

वर्षभर स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आपल्यासाठी राबणाऱ्या बैलांना देवासामान समजून बेंदूर किंवा पोळा या सणाला विशेष महत्व दिले जाते.शहरात मातीचे किंवा लाकडी बैल बनवून त्यांची पूजा करतात तर खेडेगावात त्यादिवशी बैलांना तेलाने मसाज करतात. नंतर छान आंघोळ घालून त्यांना रंगीबेरंगी रंगानी नटवतात. शिंगे रंगवतात. त्यांना फ ुलांचे हार, माळा, घुंगरू ,नक्शीद झुल

घालतात. त्या दिवशी त्यांना कामातून पूर्ण विश्रांती दिली जाते. कणकेचे उंडे , पुरणपोळी आणि अनेक प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ बनवून

प्रेमाने जेवायला घालतात. त्यांना वंदन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.नंतर त्यांची मिरवणुकीत काढली जाते. या दिवशी महाराष्ट्रातील खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. रांगोळ्या काढतात. गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. अनेक गावांमध्ये पोळ्याला शर्यतींचे आयोजन केले जाते. त्यासाठी कुस्तीतील पैलवानांना जसे चांगला खुराक देऊन, त्यांना प्रशिक्षण देऊन ,कसरती करवून कुस्तीसाठी तयार केले जाते अगदी तसेंच बैल या मानाच्या स्पर्धेसाठी तयार केले जातात. खूप प्रेक्षणीय आणि थरारक अशा या स्पर्धा असल्यामुळे लोक खूप आतुर असतात पाहण्यासाठी. गेल्या काही वर्षात या स्पर्धामध्ये बरेच अपघात,हानी होत असल्यामुळे बंदी आणली होती.त्यामुळे खूप लोक नाराज झाले होते. पण आता काही नियम घालून पुन्हा या स्पर्धाना परवानगी मिळाली असल्याने लोकांत उत्साह संचारला आहे. प्रचंड ताकद, मेहनती अशी ही बैलांची ओळख! आता मात्र ते नन्दिबैल म्हणुन लहान मोठ्या गावातुन नटुन सजुन गुबुगुबु करत , भविष्य सांगून लोकांचे मनोरंजन करताना दिसतात याची कधी खंतही वाटते,पण काळानुसार वाढती लोकसंख्या, त्यांच्या गरजा यांचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञान ही आज

काळाची गरज आहे ती ओळखून प्रगतीसाठी

काही गोष्टी बदलाव्या लागतातच. त्यामुळे आजची नवीन पिढी ही शेती संपूर्णपणे आधुनिक साधने,बी बियाणे, सेंद्रिय रासायनिक खते , रोपे, कलमे, पाण्यासाठी स्प्रिंकलर्स, पाईप, मळणीयंत्रासारखी अनेक अत्याधुनिक यंत्रांचा वापर करून कमीतकमी वेळात जास्तीतजास्त आणि दर्जेदार उत्पन्न निर्माण करत आहे. आणि ते आता परदेशातसुद्धा निर्यात करत आहे. त्यादृष्टीने याची गरज आहेच

तरीही बळीराजांच्या नवीन पिढ्या आज आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करत असूनसुद्धा अजूनही त्याच श्रद्धेने आपल्या पूर्वजांना धनधान्य देणाऱ्या बैलांची आठवण जतन करते आहे याचे खरोखर कौतुक वाटते आणि अभिमानही वाटतो. हा सण बैलांच्या कष्टाचा आणि योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे याचे अजूनही लोकांना स्मरण,भान आहे हीच भारतीय संस्कृतीची खरी जीत आहे. संस्कृतीचा हा वारसा असाच पुढील पिढीतही अखंडीत सुरु रहावा हिच सदिच्छा.

# जादू शब्दांची, समृद्धी मराठीची

**ज्योतिर्मय साहित्य**

शब्दांत फार विलक्षण जादु आहे .काही शब्दांची जागा बदलली की अर्थ बदलतो.उदा. सांगायच म्हटलं तर बघा रस्त्यावर खड्डा पडला असेल तर आपण खड्डा म्हणतो आणि गालावर खड्डा पडला तर त्याला आपण खळी म्हणतो . रस्त्यावर कधी अतिशय छोटा खड्डा पडला किंवा किंचित असा असला तरी त्याला आपण रस्त्यावर खळी पडली असे कधीच म्हणत नाही मात्र गालावर पडलेल्या खड्ड्याला खळी म्हणतो तर एखादया वेळेस रागाने किंवा कुणाच्या माघारी त्याच्या गालावर काय खड्डे होते? असेही म्हणतो. अशी ही गमंत खड्डा आणि खळीची.




खड्डा आणि खळी मात्र योग्य वेळी आपली आपली खेळी खेळत असतात. उदाहरण द्यायचे असल्यास रस्त्यावरच्या खड्यात बळी ही जाऊ शकतो तर गालावरची सुंदर खळी एखादया कविसाठी सुंदर काव्य बनून एखाद्याची कळी फुलवू शकतें किंवा एखादा व्यक्ती एखाद्या मुलीच्या प्रेमातही पडू शकतो.

आणखी एक शब्द आहे डाग. भिंतीवर एखादा काळा गोल डाग पडला तर आपण डाग म्हणतो मात्र तसेच काही शरीरावर दिसलं कि त्याला तीळ म्हणतो. आभाळ भरुन आलं कि माया, प्रेम ओसंडून वाहतं आणि आभाळ फाटलं कि संकटं येतात. बघा ना, आभाळ ही कसं असतं? एखादया स्त्री ला दायी जवळ जायची वेळ आली कि जीवनातील सर्वश्रेष्ठ आनंद म्हणजे ती, आई होण्यास काही अवधीच असतो आणि ती आई झाली की घरच्या सर्वांना ते बाळ पाहण्याची घाई असते.

आपल्याला माठातलं पाणी प्यायला आवडतं पण आपल्या मुलाला कुणी माठ म्हंटलेलं आवडत नाही. शब्द एकच आहे माठ पण त्याची दोन वेगवेगळ्या शब्दांशी गाठ पडली की तो अर्थ बदलून जातो. चुकूनही कुणाला माठ म्हणू नये, नाही तर तो आधीच सैल होत असलेल्या नात्यातील धाग्याची वाट लावतो. जेवण गोड असलं कि आनंद वाटतो पण शब्दांची हेराफेरी झाली तर गोडजेवण, फक्त आठवणीच मागे ठेवतं. कुत्रा तर प्रामाणिक असतो पण मनुष्याला एखादया वेळी भांडणा मध्ये कुणी कुत्र्या म्हणून ओरडले की खूप वाईट वाटते. पण येथे मात्र खऱ्या कुत्राची, या प्रामाणिक प्राण्याची विटंबना केल्या जाते .

दिवस या शब्दासोबत राहिले, गेले, फुलले, उरले, संपले, हरवले, हे शब्द दिवसाला कधी झोपाळ्यावाचुन झुलवतात तर कधी आयुष्यातून पळवितात. मराठी फुल प्रसन्नता वाढवीतें तर इंग्रजी मूर्ख बनविते. जागा हा शब्द आपली संपती दाखविती तर कधी कधी माणसाला त्याची जागा दाखविती. काळ आला कि नको वाटतं पण सकाळ मात्र हवीहवीशी वाटते. गार पाणी प्यायला बरं वाटतं पण कुणी व्यक्ती गार पडला म्हटलं की भिती वाटते.

सहसा बंधन हा शब्द संस्कार दर्शविती पण बंधनात रहायला कुणालाच नको वाटतं. जेवायला खुप पाहुणे आली कि राडा पडतो आणि टारगट पोरात किवा ईतर सामाजिक ठिकाणी भांडण झाले कि राडा होतो. सहसा गर्दी नको वाटते पण आपले आवडते हीरो हेरॉईन आले की आपण दर्दी असल्यासारखं बघायची गर्दी करतो. तर असे हे अनेक शब्द गमती जमती घडवतात पण त्याच्याशी मैत्री केली की आयुष्याचे दोस्त बनुन राहतात आणि ही अशी ही मराठी शब्दांची जादू आपल्या मराठीला आणखी सुंदर करते समृद्ध करते.

# जिंदगी आहे तरी काय?


**ज्योतिर्मय साहित्य**

जिंदगी, खरतर हा हिंदी शब्द आहे. पण जिंदगी, जिंदगी म्हणजे काय दोस्तांनो तर आपण एक साधारणपणे असे म्हणू की जिवन. पण खरंच एवढा साधा अर्थ आहे का जिंदगीचा? मला तरी नाही वाटत. जिंदगीचा अर्थ समजायला अख्खी जिंदगी जावी लागते, आणि जरी अख्खी जिंदगी गेली तरी कळेलच असेही नाही. कारण जिंदगी विविधतेने नटलेली, बहरलेली आहे, आपण तीच्याकडे कसे पाहतो तीचा कसा आस्वाद घेतो त्याप्रमाणे आपल्याला तीचे रंग दिसू शकतात. आणि म्हणूनच म्हंटलं गेलं आहे की जो न देखे रवी, वह देखे कवी. हिंदी चित्रपटसृष्टीतील वेगवेगळ्या गितकारांनी त्यांच्या गाण्यातून जिंदगीचे जे वर्णन केले आहे, तीची विविध रूपं आपल्याला दाखवली आहेत ती खूप छान आहेत. तूम्ही कधी विचारही केला नसेल की जिंदगीची इतकी रूपं आहेत. चला तर पाहूया गाण्यातून दिसलेली (खरंतर ऐकलेली) जिंदगी.



पडद्यावर राजेश खन्ना व आवाज किशोरकुमारचा जिंदगी एक सफर है सुहाना, यहाँ कल क्या होगा किसने जाना. अगदी खरं आहे ऊद्या काय होणार आहे हे माहीत नसतं, म्हणून आजचा दिवस छान जगून घ्या. पुन्हा राजेश खन्ना व किशोरकुमारची जोडी, पण सिनेमा वेगळा, गितकार वेगळा काय म्हणतात तर जिंदगीके सफरमें गुजर जाते है जो मकाम, वो... फिर नही आते. अगदी पटण्यासारखं आहे गेलेले दिवस येतात का कधी परत ? ह्याच जोडगोळीने म्हणजे राजेश खन्ना व किशोरकुमार यांनी अजून एक जिंदगीवरचं खूप छान गाणं दिलेलं आहे, ते म्हणजे जिंदगीका सफर, है यह कैसा सफर, कोई समझा नही, कोई जाना नही. राजेश खन्नाच्या तोंडी जिंदगीवरचं अजून एक मस्त गाणं, पण इथे आवाज मन्ना डे चा सिनेमा आनंद आणी गाणं जिंदगी.... कैसी है पहेली हाये, कभी ये हसाये... कभी ये रूलाये. खरंच ही जींदगी एक पहेली म्हणजेच कोडं आहे, कोणालाही न सुटणारं.

तसा पाऊस तर कधीही पडतो, पण कदाचीत त्या रात्रीचा पाऊस काही वेगळा असावा कारण गाणं आहे जिंदगीभर नही, भूलेगी वह बरसातकी रात, एक अंजान हसीनासे मुलाकातकी रात गायक अर्थातच लता आणि रफी. दूर्रीया नावाचा एक सिनेमा आला होता ज्याच्यात उत्तमकुमार व शर्मिला टागोर यांनी काम केले होते, त्यांच्या तोंडी हे गाणं होतं जिंदगी.... जिंदगी..., मेरे घर आना जिंदगी. ह्याशिवाय यह जिंदगी ऊसीकी है, जिंदगी की ना टूटे लडी, जिंदगी हर कदम इक नयी जंग है, मै जिंदगीका साथ निभाता चला गया, अशी आणखी पण काही गाणी आहेत इथे प्रत्येकाचा उल्लेख करणं शक्य नाही ज्याच्यातून आपल्याला जिंदगीचे विविध रंग दिसतात. जिंदगीचे अनेक पैलू वेगवेगळ्या गितकारांनी त्यांच्या गाण्यांतून आपल्याला उलगडून दाखवले आहेत. आणि त्या



शेखर देशपांडे
संपर्क : 98817 34580

सुपरहिट गाण्यांमधे संगितकार व गायकांचा देखील तेवढाच महत्वाचा वाटा आहे. तेव्हा मित्रहो जिंदगीचा प्रवास करत असताना त्याची मजा घेत मस्त जगावं. आनंद सिनेमातला तो डायलॉग आठवतो ना, बाबूमोशाय, जींदगी बडी होनी चाहिये लंबी नही.

मग चालू राहू द्या तुमचा जिंदगीका सफर, भेटूयात आपण पुनः एखादा नवीन विषय घेऊन.

# पुण्यात अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशन सुरू, देशभरातील १२ संस्थांचा सहभाग

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** भालचंद्र ज्योतिर्विद्यालय आयोजित ४३ व्या अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशनाचे उदघाटन पुण्यात गुरवारी महालक्ष्मी मंगल कार्यालय (मित्रमंडळ, पर्वती) येथे झाले. दोन दिवसीय या अधिवेशनात देशभरातील नामवंत ज्योतिर्विद सहभागी झाले आहेत. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत विविध चर्चासत्रे, मार्गदर्शन सत्रे आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील १२ संस्थांचा या अधिवेशनाच्या आयोजनात सहभाग आहे.ज्योतिष प्रसारासाठी कार्य करण्याचे आवाहन वक्त्यांनी यावेळी बोलताना केले.

या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष अरुण हुपरीकर आणि डॉ. नीलेश कुलकर्णी आहेत. उदघाटन सोहळा उल्हास पाटकर, विजय जकातदार, अविनाश मग्गीरवार, राज कुंवर, नवनीत मानधनी, चंद्रकला जोशी, रोहित वर्मा, नवीनभाई शहा, व. दा. भट, उमेश कुलकर्णी व कैलास केंजळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी उल्हास पाटकर यांचा अमृतमहोत्सव निमित्त सपत्निक सत्कार करण्यात आला. तसेच विजय जकातदार दांपत्याला चंद्रपुष्प पुरस्कार आणि रमेश पलंगे यांना वास्तूमहर्षी पुरस्कार प्रदान करण्यात आला. गौरी केंजळे यांनी सूत्रसंचालन केले. ज्योतिषविषयक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

या अधिवेशनाचा दुसऱ्या दिवशीचे कार्यक्रम २२ ऑगस्ट रोजी होणार असून त्यावेळीही ज्योतिष विषयक विविध सत्रे आणि पुरस्कार वितरण सोहळे पार पडणार आहेत.



२२ ऑगस्ट रोजी दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे उद्घाटन डॉ.सुनीता पागे,डॉ.सीमा देशमुख,नाटेकर,मोहन दाते,सिद्धेश्वर मारटकर,मोहन फडके,शुभंगिनी पांगारकर,मधुसूदन घाणेकर,शशिकांत ओक,नितीन गोठी,चारुशीला कांबळे,सोपान बुडबाडकर,जानकी पाचारणे यांच्या उपस्थितीत होणार आहे.याच दिवशी कै. शीलाताई पाचारणे स्मृती आदर्श ज्योतिष शिक्षिका पुरस्कार जयश्री बेलसरे यांना , पुष्पा शेवाळे यांना शिक्षक रत्न पुरस्कार,चित्रकार ज्ञानेश सोनार यांना ग्रहांकित जीवनगौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559